MCAER
कृषि परिषद
# महाराष्ट्र कृषी शिक्षण व संशोधन परिषद
१३२/ब, भांबुर्डा, भोसलेनगर, पुणे - ४११ ००७
सत्यमेव जयते
महाराष्ट्र शासन
इ मेल- mcaer@rediffmail.comदूरध्वनी क्र.- ०२०२५५२८२०८
संकेतस्थळ-www.mcaer.org

जा.क्र मकृप/आस्था-३/२८९३/२०२५ दिनांक :१६/१०/२०२५

## परिपत्रक

महाराष्ट्र कृषि विद्यापीठे अधिनियम १९८३ मधील प्रकरण ३, १२ (१) नुसार राज्यातील सर्व कृषि विद्यापीठाच्या कार्यामध्ये विशेषतः शिक्षण, संशोधन, विस्तार शिक्षण व समान हितसंबंध असलेल्या इतर बाबी त्यांच्याशी संबंधित कार्यामध्ये प्रभावी समन्वय घडवून आणण्यासाठी विद्यापीठाच्या कार्यामध्ये नियतकालिक मूल्यमापन करण्यासाठी आणि विद्यापीठे व त्यांची शैक्षणिक कार्य व वित्तीय व्यवहार यांवर देखरेख ठेवण्यासाठी महाराष्ट्र कृषि शिक्षण व संशोधन परिषदेची स्थापना राज्य शासनाकडून करणेत आलेली आहे. तसेच महाराष्ट्र कृषि विद्यापीठे अधिनियम १९८३ मधील १२ (३) (अ ते के) मध्ये कृषि परिषदेने पार पाडावयाची विविध कार्य नमूद करणेत आलेली आहेत.

उपरोक्त प्रमाणेची कार्ये व जबाबदा-या पार पाडणेकरिता कृषि परिषदेतील संचालकीय पदांवर महाराष्ट्र कृषि विद्यापीठे परिनियम १९९० मधील परिनियम क्र.४१ नुसार पात्रता धारण करणारे अधिकारी कार्यरत असणे आवश्यक आहे. सध्यस्थितीत कृषि परिषदे मध्ये संचालक वर्गीय संचालक शिक्षण/संचालक संशोधन/संचालक, विस्तार शिक्षण व साधनसामुग्री विकास अशी एकूण तीन पदे मंजूर आहेत. तसेच सेवा प्रवेश मंडळाकडे सहयोगी प्राध्यापक व सहायक प्राध्यापक ही पदे मंजूर आहेत. सबब, मा. मंत्री (कृषि) तथा मा. अध्यक्ष, कृषि परिषद यांनी दि.२९/०९/२०२५ च्या टिपणीवर मान्यता दिलेनुसार सदर परिपत्रकाद्वारे सदर पदांवर कृषि विद्यापीठांमधून इच्छुक पात्र अधिकाऱ्यांकडून सेवासंचित तत्वावरील नियुक्तीबाबत अर्ज मागविण्यात येत आहेत. उपरोक्त पदांपैकी संचालकीय पदांकरिता खालीलप्रमाणे पात्रतेच्या अटी लागू राहतील.

महाराष्ट्र कृषि विद्यापीठे परिनियम १९९० मधील परिनियम क्र ४१, अपेंडीक्स- आय नुसारची पात्रता-

4. "Ph.D. in any of the Faculties of agricultural universities plus "fifteen years experience in teaching, research or extension education, with atleast 10 years technical and administrative experience (taken together) but out of which-not less than five years of technical nature not below the rank of Professor or its equivalent or Master's degree in any of the Faculties of the agricultural Universities plus twenty years experience in teaching, research or extension education with atleast 10 years technical, and administrative experience _ (taken together) but out of which not less than five years of technical nature, not below the rank of Professor or its equivalent and
5. Ability to initiate, organise and co-ordinate teaching, research or extension education; and ' (3) Evidence of published papers in recognised journals."

तसेच, इतर आवश्यक पात्रता खालीलप्रमाणे-

१. वेतनश्रेणी किमान L14- 144200-218200 10,000 (AGP)

२. शिक्षण, संशोधन, विस्तार शिक्षण किंवा प्रशासकीय कामातील विशेष

३. कोणतीही विभागीय/प्रशासकीय चौकशी प्रलंबित/सुरू किंवा प्रस्तावित नसावी.

४. मागील तीन वर्षाचे गोपनीय अहवाल B+ किंवा त्यापेक्षा चांगले असावेत.

५. सांघिकरित्या काम करण्याची क्षमता असावी.

६. प्रचलित शासन नियमांचे/निर्णयांचे ज्ञान असावे.

सबब, उपरोक्त प्रमाणे पात्र अधिकाऱ्यांनी कृषि परिषदेस आपले अर्ज संक्षिप्त परिचयपत्रासह कृषि परिषदेस योग्य त्या विहीत मार्गाने **दि. ०५/११/२०२५** पर्यंत सादर करावेत.

**मा. मंत्री (कृषि) तथा मा.अध्यक्ष, कृषि परिषद यांचे मान्यतेने**

(वर्षा लड्डा-उंटवाल, भाप्रसे)
**महासंचालक**
कृषि परिषद, पुणे

**प्रति :-**

**कुलसचिव**, महात्मा फुले कृषि विद्यापीठ, राहुरी/डॉ. पंजाबराव देशमुख कृषि विद्यापीठ, अकोला/वसंतराव नाईक मराठवाडा कृषि विद्यापीठ, परभणी/डॉ.बाळासाहेब सावंत कोकण कृषि विद्यापीठ दापोली

२/-आपण सदर परिपत्रक आपल्या विद्यापीठाच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करावे. तसेच आपल्या स्तरावरून परिपत्रकाद्वारे सर्व विभागांच्या निदर्शनास आणून द्यावे व इच्छुक अधिकाऱ्यांचे प्राप्त होणारे अर्ज त्वरित कृषि परिषदेस दि.०७/११/२०२५ पर्यंत सादर करावेत.

**प्रत :-** १. मा. उपाध्यक्ष/मा. महासंचालक यांचे स्विय सहाय्यक, कृषि परिषद, पुणे

२. भांडार विभाग, प्रशासन शाखा, कृषि परिषद, पुणे

२/-सदर परिपत्रक कृषि परिषदेच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करावे.